**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २९ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार.**
2. **चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील: आर्थिक सर्वेक्षण अहवालाचा अंदाज.**
3. **सर्वोच्च न्यायालयानं यूजीसी नियम २०२६ ला आव्हान देणाऱ्या याचिकांवर केली सुनावणी; नवीन यूजीसी नियमांना दिली स्थगिती.**
4. **नागपूर महानगरपालिका महापौर पदासाठी येत्या 6 फेब्रुवारीला निवडणूक.**

**आता सविस्तर बातम्या .......**

अंत्यसंस्कार अजित पवार

राज्याचे उपमुख्यमंत्री, तसंच अर्थ, नियोजन, उत्पादन शुल्क खात्याचे मंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर आज बारामती इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे दोन्ही पुत्र पार्थ आणि जय पवार यांनी त्यांना मुखाग्नी दिला. यावेळी बंदुकीच्या ३ फेरी झाडून त्यांना सलामी देण्यात आली. त्यांच्या निधनामुळे राज्य सरकारनं ३ दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे. अजित पवार यांच्या अंत्यसंस्काराला  केंद्रीय मंत्री अमित शाह, नितीन गडकरी, रामदास आठवले, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, मुरलीधर मोहोळ, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्यासह विविध पक्षांचे नेते उपस्थित होते. तसंच ज्येष्ठ नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह पवार कुटुंबातील सर्व सदस्य उपस्थित होते. पवार यांच्या निधनानं संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली असून लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देण्यासाठी हजारो शोकाकुल नागरिकांनी अंत्यसंस्काराच्या ठिकाणी गर्दी केली होती.

ब्लॅक बॉक्स

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि अन्य चार जणांच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स अपघातस्थळावरून ताब्यात घेण्यात आल्याची माहिती नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं दिली आहे. या प्रकरणाचा तपास सखोल, पारदर्शकपणे आणि  निश्चित काळात पूर्ण करण्यास सर्वोच्च प्राधान्य असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

आर्थिक सर्वेक्षण अहवाल

चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील, असा अंदाज आज संसदेत सादर झालेल्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी हा अहवाल सादर केला.  ग्राहकांकडून होत असलेली खरेदी आणि गुंतवणूक या आधारे यंदा देशाचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील आणि सलग चौथ्या वर्षी भारत ही जगातली सर्वाधिक वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था राहील, असा अंदाज या आर्थिक पाहणी अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. दरडोई वार्षिक उत्पन्न २ लाख ५ हजार रुपयांवरून, २ लाख २० हजार रुपयांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. आगामी आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ६ पूर्णांक ८ ते ७ पूर्णांक २ टक्क्यांच्या दरम्यान राहील, असा अंदाज आहे. जीएसटीमधे केलेल्या सुधारणा, जागतिक पातळीवरच्या संकटांचं संधींमध्ये केलेलं रूपांतर, या सगळ्या गोष्टींशी जुळवून घेण्यासाठी अर्थव्यवस्थेला पुढचं वर्ष लागेल, असं यात नमूद केलं आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरची परिस्थिती अस्थिर असली, तरी

निराश व्हायचं कारण नाही. निर्यातीवर येत असलेले निर्बंध आणि प्रगत राष्ट्रांकडून तंत्रज्ञानाची होणारी अडवणूक यावर मात करण्यासाठी स्वदेशीवरचं अवलंबित्व वाढवण्याची गरज आर्थिक सर्वेक्षण अहवालात व्यक्त केली आहे. त्यासाठी कच्च्या मालाचे दर कमी करण्याचं धोरण यात सुचवलं आहे. पायाभूत सुविधा, परवडणाऱ्या दरात कच्चा माल उद्योगांना उपलब्ध झाला, मनुष्यबळ चांगल्या दरात उपलब्ध झालं, तर देशांतर्गत निर्मित वस्तूंची किंमत कमी व्हायला यामुळं मदत होईल, असंही यात म्हटलं आहे.डॉलरच्या तुलनेत रुपयाचं सध्याचं मूल्य हे देशाच्या आर्थिक परिस्थितीचं नेमकं चित्र उभं करत नाही. २०२५ या वर्षात वस्तूंच्या आयातीत व्यापार तूट होती, तर आयातीच्या तुलनेत आपण अधिक सेवांची निर्यात केली. पण रुपयाला सावरण्यासाठी हे पुरेसं ठरलं नसल्याचं आर्थिक पाहणी अहवालात नमूद केलं आहे. गुंतवणुकीसाठी सुरक्षित ठिकाण असल्यानं सोनं आणि चांदीतली तेजी येत्या काळातही कायम राहील, असंही यात म्हटलं आहे.

पंतप्रधान अर्थसंकल्पीय अधिवेशन

प्रलंबित समस्यांपलीकडे जाऊन दीर्घकालीन उपाययोजनांच्या मार्गावर देशाची वाटचाल होत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. नवी दिल्ली इथं सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी ते संसद भवन परिसरात बातमीदारांशी बोलत होते.

***देश लॉन्ग टर्म सोल्यूशन्स के मार्ग पर मजबूती के साथ कदम रख रहा है और जब लॉन्ग टर्म सोल्यूशन्स होते हैं, तब प्रिडिक्टिबिलिटी होती है, जो विश्व में एक भरोसा पैदा करती है। हमारे हर निर्णय में राष्ट्र की प्रगति यह हमारा लक्ष्य है। हम टेक्नोलॉजी के साथ स्पर्धा भी करेंगे हम टेक्नोलॉजी को आत्मसात भी करेंगे, लेकिन उसके साथ साथ हम मानव केंद्रित व्यवस्था को जरा भी कम नहीं आंकेगे।***

सुधारणा, कार्यक्षमता आणि परिवर्तन या तीन तत्त्वांवर केंद्र सरकार काम करत आहे. विविध कल्याणकारी योजनांचा लाभ समाजाच्या शेवटच्या वर्गापर्यंत पोहोचवण्यावर सरकारचा भर असल्याचं असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं.

संसद प्रश्नोत्तरे

प्रधानमंत्री शहरी आवास योजनेअंतर्गत देशात आतापर्यंत एक कोटी ६४ लाखांहून अधिक घरांना मंजुरी देण्यात आली आहे. केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी कार्य राज्यमंत्री तोखन साहू यांनी आज लोकसभेत ही माहिती दिली. ते म्हणाले की, मंजूर घरांपैकी ९८ लाखांहून अधिक घरांचं काम पूर्ण करून लाभार्थ्यांना देण्यात आली आहेत. या योजनेचा देशात एक कोटींहून अधिक नागरिकांना लाभ मिळाल्याचं मंत्र्यांनी सांगितलं.

अभिव्यक्ति स्वातंत्र्य

अभिव्यक्तिस्वातंत्र्य हा मूलभूत अधिकार असला, तरी तो अनिर्बंध नाही आणि एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेची बदनामी करण्यासाठी तो वापरला जाऊ शकत नाही, असा निर्वाळा दिल्ली उच्च न्यायालयानं दिला आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर संविधानानंच काही निर्बंध घातले असून, इतरांच्या सन्मानाला घातक किंवा बदनामीकारक ठरणाऱ्या वक्तव्याला हा अधिकार संरक्षण देत नाही, असं न्यायालयानं म्हटलं आहे.

युजीसी नियम

सर्वोच्च न्यायालयानं यूजीसी नियम २०२६ ला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी केली. हे नियम सामान्य श्रेणींविरुद्ध भेदभाव करणारे आहेत या कारणास्तव त्यांना आव्हान देण्यात आलं होतं. सुनावणीदरम्यान, सर्वोच्च न्यायालयानं नवीन यूजीसी नियमांना स्थगिती दिली. २०१२ चे नियम पुढील आदेशापर्यंत लागू राहतील, असे सांगून सर्वोच्च न्यायालयानं कडक टीका केली की, नवीन नियम

अस्पष्ट आहेत आणि नवीन यूजीसी नियमांचा गैरवापर होऊ शकतो. सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकारला नोटीस बजावली आणि पुढील आदेशापर्यंत नवीन यूजीसी नियमांना स्थगिती दिली. या प्रकरणाची पुढील सुनावणी १९ मार्च रोजी होणार आहे. मुख्य न्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्य बागची यांच्या खंडपीठानं या रिट याचिकांवर सुनावणी केली. सुनावणीदरम्यान, मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी प्रश्न उपस्थित केला की आपण जातविरहित समाजाकडे वाटचाल करावी की आपण मागे जात आहोत. ज्यांना संरक्षणाची आवश्यकता आहे, त्यांच्यासाठी एक व्यवस्था हवी अशी मागणी त्यांनी केली. केंद्र सरकार आणि यूजीसीकडूनही त्यांनी उत्तरे मागितली. एक विशेष समिती स्थापन करता येईल, असे सुचवत नवीन नियमांची भाषा स्पष्ट करण्यासाठी तज्ज्ञांची आवश्यकता असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. यूजीसी नियम २०२६ हे २३ जानेवारी २०२६ रोजी अधिसूचित करण्यात आले होते. त्यानंतर अनेक याचिकाकर्त्यांनी या नियमांना आव्हान दिले आणि असा युक्तिवाद केला की, ते मनमानी, भेदभाव करणारे आणि संविधान आणि विद्यापीठ अनुदान आयोग कायदा, १९५६ चे उल्लंघन करणारे आहेत.

प्रगती मंच-बेंबळा प्रकल्प

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या PRAGATI या महत्त्वाकांक्षी प्लॅटफॉर्ममुळे विदर्भातील बेंबळा सिंचन प्रकल्पाला निर्णायक गती मिळाली आहे. यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा नदीवरील हा प्रकल्प २ एप्रिल २००७ रोजी मंजूर झाला होता. २५ ऑक्टोबर २०२३ रोजी PRAGATI अंतर्गत पंतप्रधानांनी आढावा घेतल्यानंतर भूसंपादन, कालवे आणि कंत्राटी अडचणींवर ठोस निर्णय घेण्यात आले. त्यानंतर प्रकल्प कामांना वेग मिळत ३० जून २०२५ रोजी तो कार्यान्वित झाला. या प्रकल्पामुळे विदर्भातील शेतकऱ्यांना सिंचन सुविधा, जलसुरक्षा आणि कृषी उत्पन्नात वाढ होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मनपा महापौर निवड

नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीतील निवडून आलेल्या सर्व नवनिर्वाचित सदस्यांची पहिली विशेष सभा येत्या ६ फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजता रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृह इथं आयोजित करण्यात आली आहे. सभेत महापौर(महिला), उपमहापौर पदासाठी निवडणूक होणार असून, 16 स्थायी समिती सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे. त्यानुसार महापौर, उपमहापौर पदासाठी येत्या २ फेब्रुवारी रोजी सिव्हील लाईन्स येथील मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्थायी समिती सभागृह इथं सकाळी 11 ते दुपारी 3 वाजेपर्यंत नामनिर्देशन पत्र स्वीकारले जाणार आहेत. संबंधित विशेष सभेची सूचना मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी नवनिर्वाचित सदस्यांना दिली आहे. विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी महापौर, उपमहापौर निवडीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. याकरिता पीठासीन अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या सूचनेनुसार, सर्व नवनिर्वाचित सदस्यांना ६ फेब्रुवारी रोजी कविवर्य सुरेश भट सभागृह इथं होणाऱ्या विशेष सभेला उपस्थित राहण्याचं सूचित करण्यात आलं आहे. विशेष सभेला सुरुवात झाल्यानंतर पीठासीन अधिकारी उमेदवारी अर्जांची छाननी करणार आहेत. त्यानंतर उमेदवारी मागं घेण्यासाठी १५ मिनिटांचा कालावधी दिला जाणार आहे. नवनिर्वाचित सदस्यांनी सभेला येताना निवडणूक विभागामार्फत देण्यात आलेलं सूचनापत्र आणि निवडून आल्याचं प्रमाणपत्र सोबत आणावं, असं आवाहन नागपूर मनपाच्या निगम सचिव डॉ.रंजना लाडे यांनी केलं आहे.

पर्यटन

भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या इंडिया टुरिझम, मुंबई कार्यालयातर्फे नागपुरात देशांतर्गत पर्यटन रोड-शोचं आयोजन करण्यात आलं.

कर्नाटक टुरिझम सोसायटीच्या सहकार्यानं झालेल्या या रोड शो मध्ये कर्नाटकच्या वारसा, संस्कृती, इको-टुरिझम, वेलनेस, वन्यजीव आणि साहसी पर्यटनाच्या संधी मांडण्यात आल्या. कर्नाटकातील 34

पर्यटन भागधारकांनी नागपूर आणि परिसरातील ट्रॅव्हल एजंट्स आणि टूर ऑपरेटर्ससमोर विविध पर्यटन उत्पादनं सादर केली. यावेळी इन्डिया टुरिझमच्या पर्यटन माहिती अधिकारी *स्वाती बरसोडे* यांनी अधिक माहिती दिली....

***टुरिझम प्रमोशन करण्यासाठी आहे आणि त्याच्यामध्ये घरेलू पर्यटन ज्याला म्हणतात डोमेस्टिक टुरिझम प्रमोशन म्हणजे आपल्याच भारतातल्या लोकांना, नागरिकांना अजून जे लेसर नॉन डेस्टिनेशन आहेत की जी जास्त प्रमाणात पॉप्युलाराइज झालेली नाहीयेत किंवा ज्यांना ज्यांच्याकडे जास्त अटेंशन दिलं गेलं पाहिजे. बिसाईड्स नेहमीचे आपले रेगुलर जाणारे जे सर्किट्स आहेत त्याच्या व्यतिरिक्त त्यांनाही त्याच्यामध्ये प्रोत्साहन मिळावं आणि त्याचं प्रमोशन व्हावं या दृष्टीने हा रोड शो अरेंज केलेला आहे.***

*****